महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
माझी वसुंधरा अभियान संचालनालय
दलामल हाऊस, पहिला मजला, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पाईंट, मुंबई ४०००२१
मेल : director.mazivasundhara@gmail.com director.mazivasundhara@mpcb.gov.in

क्रमांक : अभियान २०२१/ प्र.क्र.४६ दिनांक : २३ जुलै, २०२१

प्रति,

आयुक्त,
महानगरपालिका (सर्व)

विषय : माझी वसुंधरा अभियान २०२०-२१

महोदय / महोदया,

माझी वसुंधरा अभियानांतर्गत सन २०२०-२१ मध्ये भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धे अंतर्गत आपल्या शहराने सहभाग घेवून निसर्गाशी संबंधित पंचतत्वांचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठी खारीचा वाटा उचलला या बद्दल मी आपले व आपल्या संपूर्ण टीमचे प्रथमत: आभार मानतो.

२. माझी वसुंधरा अभियानांतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये सर्वच सहभागी संस्थांची कामगिरी चांगली झाली आहे. परंतु, स्पर्धेतील विजेता हा सर्वोत्तम कामगिरी वरून ठरतो. त्यानुसार, या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करून विजेते ठरलेल्या संस्थांचा जाहिर सन्मान करण्यात आला.

३. **आपल्या स्थानिक संस्थेच्या माझी वसुंधरा अभियानातील सहभागा बाबत आपणासही प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र या पत्रा सोबत आपणास प्रदान करण्यात येत आहे.**

४. **माझी वसुंधरा अभियान २.० च्या अंमलबजावणी मध्येही आपली स्थानिक संस्थां सहभागी होवून पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठी आपला मोलाचा वाटा उचलेल अशी अशा व्यक्त करून, आपणास व आपल्या संपूर्ण टीमला शुभेच्छा देतो.**

शुभेच्छांसह !

आपला स्नेहांकित,

२३/७/२१

(सुधाकर ज्ञा. बोबडे)
अभियान संचालक

पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग,
महाराष्ट्र शासन

# माझी वसुंधरा अभियान

५ जून २०२१ - जागतिक पर्यावरण दिन

Majhi Vasundhara MY EARTH
#AWARDS-2021

WORLD ENVIRONMENT DAY

UNITED NATIONS DECADE ON ECOSYSTEM RESTORATION 2021-2030

## प्रमाणपत्र

पंचतत्वांचे संवर्धन, संरक्षण व जतन करून शाश्वत विकास साधण्यासाठी सुरू केलेल्या “माझी वसुंधरा अभियान २०२०-२१” च्या स्पर्धेत

**वसई-विरार महानगरपालिका, जिल्हा पालघर यांचे सहभागाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन**

या अभियानाची लोकचळवळ व्हावी या करीता पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा !

आदित्य ठाकरे, मंत्री
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार

मनीषा पाटणकर-म्हैसकर, भा.प्र.से.
प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार विभाग